K.T.S.P.Mandal's

# Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar

## Department of Economics

## Class:- F.Y.B.Com

## Subject:- Business Economics ( Micro I ) 113

## व्यावसायिक अर्थशास्त्र □सूक्ष्म)–I

## Semester – I

Assi.Prof.Dhanapune S.V.

## प्रास्ताविक

व्यवसायिक अर्थशास्त्र सन 1950 नंतर नव्याने विकसित झालेली अर्थशास्त्राची स्वतंत्र एक उपयोजित शाखा आहे. व्यवसायिक अर्थशास्त्र परंपरागत अर्थशास्त्राचा एक अभिन्न भाग आहे. व्यवसायाच्या वास्तव स्थितीचे स्पष्टीकरण करण्यासाठी अर्थशास्त्रातील संकल्पना , तत्वे, नियम व सिद्धांतांचा वापर करून व्यवस्थापकीय निर्णय घेणे, व्यवसायाच्या समस्या सोडविणे, व्यवसायाचे भविष्यकालीन नियोजन करणे आणि व्यावसायिक धोरणे ठरविण्यासाठी व्यवसायिक अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. व्यावसायिक अर्थशास्त्रात महत्त्वाचे आर्थिक निर्णय घेण्यासाठी अर्थशास्त्रातील मागणी-पुरवठा, किंमत, उत्पन्न ,खर्च ,नफा आणि स्पर्धा या संकल्पनांचा वापर केला जातो. व्यावसायिक अर्थशास्त्राला व्यवस्थापकीय अर्थशास्त्र उद्योगसंस्थेचे अर्थशास्त्र असे संबोधले जाते.

# 1.1.1 व्यवसायिक अर्थशास्त्र : अर्थ व व्याख्या

व्यावसायिक अर्थशास्त्राचा अर्थ समजून घेण्यासाठी व्यावसायिक अर्थशास्त्राची व्याख्या व वैशिष्ट्ये समजून घेणे आवश्यक आहे.व्यवसायिक अर्थशास्त्राच्या विविध अभ्यासकांनी वेगवेगळ्या प्रकारे व्याख्या दिल्या आहेत. त्यामुळे व्यावसायिक अर्थशास्त्रची सर्वसामान्य होईल अशी एक व्याख्या देता येत नाही.

# 1.1.1 व्यवसायिक अर्थशास्त्र : अर्थ व व्याख्या

**व्यावसायिक अर्थशास्त्राच्या काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे –**

1) " व्यवसायिक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त असणारी व्यावहारिक श म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय अमूर्त सिद्धांत आणि व्यवस्थापकीय पद्धतीतील अंतर कमी करणारी अर्थशास्त्राची एक विशेष होय."

**- हेन्स, मोटे, पोल**

2)" व्यवसायिक परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी अर्थशास्त्रीय विचार प्रणालीचा वापर करणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे व्यवसायिक अर्थशास्त्र होय."

**- मेक नायर व मेरियन**

3)" व्यवस्थापनाचा निर्णय घेणे आणि भावी नियोजन करण्याच्या उद्देशाने आर्थिक सिद्धांताचे व्यवसाय पद्धतीची करण्यात आलेले एकात्मीकरण म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय."

**- स्पेन्सर व सेलिगमन**

4)" व्यवसायिक धोरणांची निश्चिती करण्यासाठी अर्थशास्त्रीय विश्लेषणाचा कसा उपयोग होतो हे दर्शवणारे शास्त्र म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय."

**- जोएल डीन**

# व्यवसायिक अर्थशास्त्रची प्रमुख वैशिष्ट्ये

1. व्यवस्थापकीय निर्णय
2. सूक्ष्म अर्थशास्त्रावर आधारित
3. समग्र अर्थशास्त्रावर आधारित
4. आर्थिक सिद्धांताचे व्यावहारिक स्वरूप
5. समस्या व समस्यांची सोडवणूक
6. व्यवसायसंस्थेचे अर्थशास्त्र

वरील व्याख्यावरून व्यवसायिक अर्थशास्त्रची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**व्यवसायिक अर्थशास्त्रची प्रमुख वैशिष्ट्ये**

1. व्यवस्थापकीय निर्णय

2. सूक्ष्म अर्थशास्त्रावर आधारित

3. समग्र अर्थशास्त्रावर आधारित

4. आर्थिक सिद्धांताचे व्यावहारिक स्वरूप

5. समस्या व समस्यांची सोडवणूक

6. व्यवसायसंस्थेचे अर्थशास्त्र

# 1.1.2 व्यवसायिक अर्थशास्त्राचे स्वरूप

- 1. सूक्ष्म आर्थिक स्वरूप
- 2. व्यवसायिक अर्थशास्त्र हे आदर्शअनुसारी शास्त्र आहे
- 3. व्यावसायिक अर्थशास्त्र हे वर्णनात्मक नसून यथार्थचित्र दर्शविणारे शास्त्र आहे
- 4. व्यावसायिक अर्थशास्त्र हे फलप्रामाण्यवादी किंवा व्यावहारिक आहे
- 5. व्यावसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप समन्वयाचे असते
- 6. व्यावसायिक अर्थशास्त्र हे एक शास्त्र आणि कला आहे
- 7.जास्त शास्त्रशुद्ध विषय
- 8.सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

## 1. सूक्ष्म आर्थिक स्वरूप

- व्यावसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप सूक्ष्म स्वरूप
- सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू उद्योग संस्था
- वैयक्तिक पातळीवरील उद्योग संस्थेच्या समस्यांचा अभ्यास केला जातो

## 2. व्यवसायिक अर्थशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र आहे

- नेमके काय केले पाहिजे याबाबत चे विश्लेषण
- संघटनात्मक उद्दिष्टे कार्यक्षमपणे साध्य करण्यासाठी व्यावसायिक अर्थशास्त्र व्यवस्थापनाला मार्गदर्शन करते
- चांगले परिणाम साध्य करण्यासाठी उद्योग संस्थेने कोणते  निर्णय घ्यावेत याविषयी स्पष्टीकरण देते.

## 3. व्यावसायिक अर्थशास्त्र हे वर्णनात्मक नसून यथार्थचित्र दर्शविणारे शास्त्र आहे

- व्यावसायिक अर्थशास्त्र आदर्शवादी आणि व्यावहारिक अशी अर्थशास्त्राची शाखा
- व्यवसायिक अर्थशास्त्र हे धोरणांची मांडणी, निर्णय क्षमता , भावी नियोजन करण्यासाठी अर्थशास्त्रीय तत्त्वांचा वापर कसा करावा याविषयी उपाययोजना
- व्यावसायिक अर्थशास्त्र साध्य करण्यासाठी विविध मार्ग सुचविते.

## 4.व्यावसायिक अर्थशास्त्र हे फलप्रामाण्यवादी किंवा व्यावहारिक आहे

- गृहीत परिस्थिती आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यामध्ये तफावत दिसून येते.
- व्यावसायिक अर्थशास्त्र आर्थिक सिद्धांतातील कठीण अपवादात्मक स्थिती कळते.
- दैनंदिन जीवनात उद्योगसंस्थेच्या पातळीवर येणाऱ्या व्यावहारिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न

## 5. व्यावसायिक अर्थशास्त्र चे स्वरूप समन्वयाचे असते

- सैद्धांतिक व प्रायोगिक बाजूंमध्ये समन्वय साध्य करण्यासाठी सूक्ष्म व समग्र प्रारूपांचा उपयोग करते.

## 6. व्यावसायिक अर्थशास्त्र हे एक शास्त्र आणि कला आहे

- व्यावसायिक अर्थशास्त्र हे शास्त्र आहे.
- व्यावसायिक अर्थशास्त्र शास्त्राप्रमाणे एक कला आहे.
- दिलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी काही नियमांची मांडणी केली जाते
- व्यवस्थापनाला दुर्मिळ आर्थिक संसाधनाचा चांगला व कार्यक्षम वापर कसा करायचा याविषयी मदत

## 7. जास्त शास्त्रशुद्ध विषय

- व्यावसायिक अर्थशास्त्र मध्ये अर्थमीती व रेषीय तंत्राचा वापर
- व्यावसायिक अर्थशास्त्रमध्ये नफा, खर्च, मागणीचे पूर्वानुमान करण्यासाठी व गुंतवणुकीचे विश्लेषण करण्यासाठी संख्याशास्त्रीय पद्धती व तंत्रे वापरली जातात.
- कार्यकृती संशोधनाला मदत होते.

## ८. सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

- व्यावसायिक अर्थशास्त्र मानवतावादी विचाराला महत्त्व देते
- देशाचे सामाजिक व राजकीय पर्यावरण विचारात घेऊन व्यवसायसंस्थांची कार्यपद्धती ठरवते.
- मानवी मूल्य व देशाची सांस्कृतिक चौकटीला बाधा पोहोचणार नाही याचा विचार
- बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनामुळे देशातील सांस्कृतिक बैठकीला बाधा पोहोचणार नाही याबाबत दक्षता घेतली जाते.